SJIF 2015 : 3.801
ISSN: 2348-3083
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR
HUMANITY SCIENCE & ENGLISH LANGUAGE

# महात्मा ज्योतिराव फुले यांची सत्यशोधक समाज चळवळ

**निशा सिताराम मोरे, Ph. D.**

*(सहयोगी प्राध्यापक), श्रीमती. सी. के. गोयल कला व वाणिज्य महाविद्यायल, दापोडी , पुणे -१२*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

महात्मा जोतीराव फुले महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे प्रणेते आहेत. कुशलसंघटक आणि तत्ववेत्ता या गुणांनी संपन्न होते. जातीव्यवस्था व वर्णव्यवस्थेने शुद्रातीशुद्रांची जी पिळवणूक चालवली होती ती थांबविण्याकरिता त्यांनी अहोरात्र प्रयत्न केले. शुद्रातिशुद्रांची पिळवणूक थांबविण्यासाठी त्यांनी सत्यशोधक समाज चळवळ दि. २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे स्थापन केली. सत्यशोधक समाज ही प्रामुख्याने एक समाजिक चळवळ होती, तीचा मुख्य उद्देश समाज सुधारणा करणे, सामाजिक अनिष्ट चालीरिती, रुढी परंपरा ज्याच्यामुळे शुद्र आणि अतिशुद्र समाज मानसिक गुलामगिरीत अडकला होता, त्यांना मुक्त करण्यासाठी या समाजाची स्थापना करण्यात आली. शुद्र व अतिशुद्र समाजाची जातीच्या आधारे गैरफायदा तत्कालीन समाजातील वरच्या तीनही वर्णाचे व ब्राह्मण ,भट, जोशी, उपाध्ये उच्यवर्णिय वर्ग घेत असे व त्यांची अत्यंतिक पिळवणूक करत असे.  समाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विषमतेला पोषक असे हे वातावरण तयार झाले होते. हजारो वर्षांपासून शुद्रांना नीच मानून त्यांची पिळवणूक, फसवणूक व नाडवणूक ब्राह्मण समाजाकडून होत होती. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाज नामक समाजिक चळवळ सुरु करून या अनिष्ट चालीरिती पासून शूद्र - अतिशूद्रांना वाचविण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले यांच्या मते भटजी लोक त्यांनी रचलेल्या  ग्रंथांच्या आधारे हजारो वर्षांपासून शुद्र - अतिशुद्रांना लुबाडत आले आहेत आणि पुढे देखिल ते तसेच करत राहणार होते . शुद्र अतिशुद्रांना ब्राह्मणाच्या बनावट धर्मग्रंथांपासून मुक्त करण्यासाठी त्यांनी सत्यशोधक समाज नामक सामाजिक संघटना उभारली. ही एक स्वरुपाची सामाजिक चळवळ होती. महात्मा जोतीराव फुले हे सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष व कोषाध्यक्ष होते तर नारायण गोविंद कडलक

सत्यशोधक समाजाचे चिटणिस होते. समाजातील काही समविचारी सुज्ञ मंडळींनी कृष्णराव भालेकर, डॉ. विश्राम रामजी घोले, रामशेट, बापुशेट उरवणे, राजन्ना लिंगू, रामय्या व्यंकय्या आय्यावारू, विनायक बाबाजी डेंगळे, नारायण तुकाराम नगरकर, ग्यानु मल्हारजी झगडे, लक्ष्मण हरि शिंदे, रामचंद्र विठोबा धामणकर, धोंडिराम नामदेव कुंभार, सुरतसिंग रामदिन इत्यादींनी एकत्र येऊन पुणे येथे सत्यशोधक समाज चळवळ सुरु केली. या कामी विनायक बापूजी भांडारकर व विनायक बापूजी डेंगळे तसेच सीताराम सखाराम दातार यांनी परिश्रम घेतले. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजासाठी एक घटना बनवली होती. सत्यशोधक समाजाच्या कार्यकारिणीच्या सभा लोकशाही पद्धतीने होत असत.

रामशेठ बापूशेठ उरवणे यांनी शुद्रांना सत्यशोधक समाजाचा हेतु पटवून दिल्यामुळे थोड्याच कालावधीत शुद्र समाज या चळवळीला जोडला गेला व चळवळीचे कार्य जोमाने करु लागला. धोंडीराम नामदेव, पंढरीनाथ आबाजी चव्हाण, कृष्णराव पांडुरंग भालेकर व नारायण रामजी पांढरे ही मंडळी भांबुर्डेकर होती या भांबुर्डेकरांनी  ब्राह्मण ,भट, जोशी, उपाध्ये हे उच्यवर्णिय अज्ञानी लोकास कसे फसवतात, लुटतात याबाबत सत्यशोधक समाजाचा प्रचार व प्रसार केला.

सत्यशोधक समाजाची स्थापना झाल्यापासून दोन वर्षात या चळवळीचा झपाट्याने प्रसार झाला. भांबुर्डे, हवेली, पुणे, हडपसर, पर्वती, जुनी गंजपेठ, मुंबई शहर, भिलार व सातारा येथे चळवळ फोफावली होती. पुरोहितांकडून जो अन्याय अत्याचार शुद्र – अतिशुद्रांवर होत होते,  ते दूर करण्यासाठी व त्यांच्या गुलामगीरीतून शुद्रातीशुद्रांना मुक्त करण्यासाठी व त्यांना आपल्या हक्कांची जाणिव करून देणे हा देखिल उद्देश महात्मा फुले यांचा सत्यशोधक समाज चळवळ निर्माण करण्यामागचा होता.

महात्मा फुले यांना जातीभेद अमान्य होता. मानवतावाद हा त्यांच्या विचारांचा मूळ गाभा होता. या चळवळीद्वारे शुद्रातिशुद्रांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्याच्या कामी सत्याशोधक समाज चळवळीची मदत होईल याबद्दल महात्मा जोतिराव फुले यांना खात्री होती. ब्राह्मण वर्गाने लादलेल्या मानसिक गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र वर्गाची सोडवणूक करणे हा फुलें प्रणित सत्यशोधक समाजाच्या स्थापनेचा मुख्य उद्देश होता. सत्याशोधक समाज चळवळीने त्यादृष्टिने एक विचारमंचाच्या रुपाने काम केले. धर्मग्रंथ हे इश्वर निर्मित नाहीत. सत्याशोधक चळवळीचा एकेश्वरवादाचा प्रचार केला. अखिल मानवजात ही एका परमेश्वराची लेकरं असून सर्वशक्तीमान परमेश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येकालाच अधिकार आहे व परमेश्वराची भक्ती करण्यासाठी

कोणत्याही मध्यस्थाची गरज नाही म्हणून परमेश्वर भक्ताने पुरोहित तसेच धर्मगुरू यांच्या मध्यस्थीशिवाय आपल्या परमप्रीय परमेश्वराची उपासना करावी. प्रत्येक माणसातील सद्गगुणांवर महात्मा फुले यांचा विश्वास होता. त्यांनी प्रत्येक माणसाची प्रतिष्ठा जपली पाहिजे या मुद्यावर भर दिला. त्यांच्या मते मनुष्याला त्याच्या गुणांनी श्रेष्टत्व प्राप्त होते; जातीने नव्हे. महात्मा फुले यांनी एकेश्वरवादावर भर दिला. इश्वर हा निर्गूण, निराकार व सर्वव्यापी आहे हे सांगितले. स्वर्ग, नरक, पाप, पुण्य, पुनर्जन्म इत्यादी कल्पना म. फुले यांनी अमान्य केल्या. त्यांच्या मते कोणताच धर्मग्रंथ इश्वर निर्मित नसून मानव निर्मित आहेत. या धर्मग्रंथांद्वारे मानव जातीत भेदाभेद निर्माण करून परस्परांबद्दल पराकोटीच द्वेष, उच्य निच असे भेदभाव पसरविण्यात आले. म. फुलेंच्या मते निर्मिकाचा धर्म एक आहे. तोच सार्वजनिक सत्यधर्म होय.

सत्यशोधक समाजाच्या स्थापनेनंतर इ.स. १९११ पासून सत्यशोधक समाजाच्या अधिवेशनांना सुरुवात झाली. पहिले अधिवेशन १७ एप्रिल १९११ रोजी स्वामी रामण्णा व्यंकय्या अय्यावरु यांच्या अध्यक्षतेत पार पडले.

**सार्वजनिक सत्यधर्मः** सार्वजनिक सत्यधर्म हा सत्यशोधक समाजाचा प्रमाणग्रंथ मानला जातो. सत्यशोधक समाजाचे तत्वज्ञान आपल्याला सार्वजनिक सत्यधर्मात पहावयास मिळते. त्यांनी मानवताधर्माची शिकवण सत्यशोधक समाजाच्या द्वारे संपूर्ण समाजास दिली. समाजातील शुद्रातिशुद्रांमध्ये जागृती निर्माण करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात प्रवाहित करण्याचा प्रयत्न केले. समानतेच्या तत्वावर भारतीय समाजाची पुनर्रचना झाली पाहिजे या विचारावर ते आग्रही होते.

**सत्यशोधक समाजाची शपथ:** सर्व मानव व प्राणि एकाच इश्वराची लेकरं आहेत ती माझी भावंडं आहेत. मी त्यांच्याशी बंधुत्वाच्या भावनेने वागेल. पूजा अर्चा, ध्यान भक्ती करतांना मध्यस्थ ठेवणार नाही. मी माझ्या मुलांना सुशिक्षित करेन.

**सत्यशोधक समाजाचे कार्य :**

१.महात्मा फुले यांनी सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली होती

२.पुरोहित वर्गाशी लढा देणे

३.शुद्रांमध्ये अधिकारावद्दल जागृती निर्माण करणे

४.धर्मभोळ्या कल्पना सोडून देण्यासंबंधी प्रयत्न करणे

५.धर्मातील निरर्थक व दिखाऊपणा बंद करणे

५. धार्मिक कृत्ये – विधी कोणाच्याही मध्यस्थाशिवाय कसे करावयाचे याचे ज्ञान देणे

६.बहुजन समाजाला शिक्षित करणे

७.निरर्थक खर्चाला आळा बसविणे

८.पुरोहितांशिवाय विवाह

९. मराठी भाषेतून विवाह मंगलाष्टके

१०. सामाजिक जातीय व धार्मिक उच्यनिचता, श्रेष्ठ कनिष्ठता व विषमता नष्ट करणे. जातीभेद नष्ट करण्यावर भर

११. तळागाळातील लोकांपर्यंत, शुद्रातिशूद्रांपर्यंत शिक्षण पोहोचवणे

**सत्यशोधक समाजाती तत्वे :**

१. इश्वर एक असून तो निर्गुण निराकार आहे.

२. अखिल मानवजात एकाच परमेश्वराची लेकरं आहेत.

३. सर्व शक्तीमान आहे परमेश्वराची भक्ती करण्याचा सर्वांना अधिकार आहे.

४. कोणत्याही मध्यस्थाशिवाय परमेश्वर भक्ती केली जावू शकते.

५. मानवाला जातीने नव्हे तर गुणांनी श्रेष्टत्व प्राप्त होते.

६. पुनर्जन्म, कर्मकांड, जपजाप्य इत्यादी गोष्ठी अज्ञानमूलक आहेत तसेच त्या कनिष्ठ वर्गाच्या पिळवणुकीचे साधन आहे.

७. कोणताही धर्मग्रंथ इश्वर निर्मित नाही.

८ समाजातील दुःखी पीडितांना मदत करणे.

९. गरीब शूद्रांच्या मुलांना शिष्यवृत्ती देणे.

१०. शुद्र लोकांचे वकृत्त्व सुधारण्याच्या उद्देशाने, वकृत्व स्पर्धांचे आयोजन केले जात असे. समाजातील लोकांना उत्तम भाषण देता यावे व त्यांना वकृत्व कला साध्य व्हावी या दृष्टीने दि. ७ जून १८७७ रोजी वकृत्त्व स्पर्धेचे आयोजन केले होते. वकृत्त्व स्पर्धेचे विषय सामाजिक समस्या, व त्यावरील उपाय यासारखे ज्वलंत विषय निवडले जाऊन समाजातील सदस्यांना समाजातील समस्यांबाबत जागरूक केले जात होते.

११. सत्यशोधक समाजाच्या सदस्यांचे लेखन कौशल्य वृद्धींगत करण्यासाठी समाजाद्वारे निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असे. ७ जून १८७७ रोजी राणी व्हिक्टोरिया यांना हिंदू धर्मात राहिल्यावर या धर्मातील उच्चवर्णीयांकडून काय जाच जुलूम अन्याय अत्याचार सहन करावे लागत आहेत या विषयास अनुसरून निबंधस्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

१२. गरीब शूद्र लोकांच्या मुलांस सरकारी शाळेतील शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले जात होते. मुलांना शालेय शिक्षणासाठी उत्तेजन देण्याकरिता कपडे व खाऊ वाटप कार्यक्रमांचे आयोजन केले जात होते.

१३. खेड्यातील मुलींना शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजातर्फे पुणे हडपसर येथे शाळा स्थापन केली होती. या शाळेचा खर्च चालविण्यासाठी समाजाचे फंडातून दरमहा ४ रुपये आणि गावकरी लोकांद्वारे मुलींची शाळा चालविण्यासाठी ६ रुपये वर्गणी गोळा केली जात होती. परंतु गावकऱ्याकडून सदर शाळा चालवण्याची वर्गणी गोळा न झाल्यामुळे व समाजाकडे शाळा चालविण्याइतके पैसे नसल्यामुळे ती शाळा नाईलाजाने बंद करावी लागली.

१४. महात्मा फुले यांच्या प्रयत्नांमुळे इंग्रज सरकारने शालेय खात्याला सूचना देऊन शाळेतील एकूण विद्यार्थी संख्येपैकी पाच टक्के गरीब मुलांना मोफत शिक्षण देण्याचा आदेश दिला.

१५. दुष्काळात लहान मुलांचे हाल हाऊ नये म्हणून व्हिक्टोरिया बालकआश्रम सुरु केले होते.

सत्यशोधक समाजाचे कार्य अनेक अडचणींना तोड देत पार पडत हाते. सदर कार्य परोपकारी भावाने चालले होते. या कामात समाजातील इतर मंडळींचाही जे समाजाचे सभासद नाहीत अशांचा आर्थिक हातभार लागत होता. लोक जमेल तशी मदत करत होते. सत्यशोधक समाजाच्या वर्षपूर्तीच्या दिवशी काही नियम पास करण्यात आले. महिन्याच्या दुसऱ्या व चवथ्या शनिवारी ठरलेल्या महत्वाच्या विषयावर व्याख्यान आयोजित केले जात असे व दर रविवारी संध्याकाळी परमेश्वर उपासना केली जात असे. सत्यशोधक समाजातील सभासदातील काही सभासद सोडल्यास अनेक सभासदांची परिस्थिती गरीब होती तरी देखील हे सभासद समाजातील दु:खी, पीडित बांधवांसाठी आपल्या हालाखीच्या परिस्थितीची पर्वा न करता वर्गणी देत असत व समाजात घरोघरी जाऊन गरीब पीडितांसाठी मदत गोळा करत असंत. सत्यशोधक समाजाने समाजातर्फे फंडाची उभारणी केली होती. त्या फंडामधून गरीब होतकरूंना लग्न समारंभासाठी मदत दिली जात होती. अशा प्रसंगी समाजातील सभासद व मित्रमंडळींकडून देखील मदत मिळत असे. सत्यशोधक समाजाला

मिळालेली वर्गणी सरकारी बँकेत जमा केली जात असे व गोळा झालेल्या वर्गणीबाबत जमा खर्चाची नोंद केली जात असे.

**सत्यशोधक समाजाची कार्यपद्धती:**

महात्मा फुले यांच्या मते शुद्रांनी कुटुंबातील मंगल प्रसंगी जसे विवाह, पुजा, सणवार अशा प्रसंगी भट – ब्राह्मणांची त्या शुभकार्यावर सावली देखील पडू देऊ नये. त्याच्या मते सर्व मानव जात ही समान आहे. त्यांच्यात भेदभाव करणे अयोग्य आहे. भट ब्राह्मण लोकांनी आपले वर्चस्व सर्वांवर रहावे या साठी माणसा माणसात कृत्रिम भेद निर्माण केला. उच्य निचता, श्रेष्ठता कनिष्ठतेचा विचार लोकांमध्ये पक्का केला व फूट पाडली व आपले वर्चस्व या शुद्र अतिशूद्र लोकांवर कायम केले. शुद्रातिशुद्रांना ब्राह्मणांच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी महात्मा फुले सज्ज झाले. त्यांनी धार्मिक कार्य कोणत्याही भट ब्राह्मणाकडून न करण्याचे अवाहन शूद्र समाजाला केले. आपल्याला नीच समजणाऱ्या ब्राह्मण वर्गाकडून कोणताही मंगल विधी पार पाडू नये असा संदेश त्यांनी समस्त शूद्रांना दिला. त्यांनी स्वत: मंगल प्रसंगीचे पुजाविधी तयार केले व त्यांच्या अनुयायांमध्ये त्याचा प्रचार व प्रसार केला. विवाह प्रसंगी मंगलाष्टके त्यांनी स्वत: तयार केली व विवाहाच्या मंगल प्रसंगी भट –ब्राह्मणांच्या मंगलाष्टकांना त्यांनी बाजूला सारले. विवाह प्रसंगी ती मंगळाष्टके भट ब्राह्मणांएवजी विवाहास जमलेल्या वधू वराकडील नातेसंबंधी, मित्र परिवार व वधु वराच्या घरातील त्यांचे जवळचे नातेवाईक या पैकी कुणालाही महात्मा ज्योतिबा फुलें रचित मंगलाष्टके म्हणता येत होती व तो विवाह कोणत्याही कर्मकांडाशिवाय, भक्कम दक्षिणेशिवाय अत्यंत साध्या व सुटसुटीत पद्धतीने पार पडत असे. लग्न प्रसंगी वरामुलाने म्हणावयाची मंगलाष्टके, वधुमुलीने म्हणावयाची मंगलाष्टके, लग्न प्रसंगी जमलेल्या सर्व स्त्री पुरुषांनी म्हणावयाची मंगलाष्टके, वधुवर आशिर्वाद, पूजा विधी, वराचा शपथविधी, वधुचा शपथविधी हे सर्व विधी फुलेंनी तयार केले. विवाहा सारखेच वास्तुशांती विधी त्यांनी स्वत: रचला व त्यांच्या अनुयायांनी त्या विधी अंगिकारल्या.

**महात्मा फुलेंच्या कार्याचे मूल्यमापन:**

**शैक्षणिक कार्य:** प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले पाहिजे असाआग्रह धरणारे महात्मा ज्योतिबा फुले हे पहिले भारतीय होते. त्यांनी बहुजनाच्या शिक्षणप्रसाराकडे विशेष लक्ष पुरविले. बहुजन समाजाची प्रगती

शिक्षणामुळेच होणार आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते. इंग्रज सरकारने सार्वत्रिक शिक्षणाकडे लक्ष पुरविले पाहिजे, अशी त्यांची मागणी होती.

**धर्मग्रंथांची चिकित्सा:** महात्मा फुले यांनी धर्मग्रंथांची कठोर चिकित्सा केली. समतेच्या तत्वाचा पुरस्कार केला. जाचक रुढी व परंपरेतील दोष समाजापुढे उघड केले. पौरहित्य करणाऱ्यांकडून इतर समाजाची कशी फसवणूक केली जाते त्या गोष्टीच निषेध करून त्यावर प्रकाश टाकला.

**स्त्री पुरुष समानता:** फुलेंनी समाजाला स्त्री पुरुष समानेची नवीन दृष्टी समाजाला देऊ केली. त्यांनी तत्कालीन समाजाचा रोष पत्कारून सावित्रीबाईंना शिक्षण दिले. सावित्रीबाई जोतीराव फुले पहिल्या भारतीय शिक्षिका बनल्या.

सत्यशोधक समाज स्थापनेनंतर महात्मा ज्योतिराब फुले यांचा मृत्यू झाला. संघटन विस्कळीत झाले पण त्यांनी मांडलेले विचार मात्र वाढीस लागले. दलित, शोषित बहुजन समाजाच्या चळवळी जोमाने उभ्या राहिल्या. सत्यशोधक समाजाने दलितांच्या अनेक चळवळींना प्रेरणा दिली. समग्र दलितमुक्ती आंदोलनाचा पाया घातला. या चळवळीने शूद्रांमध्ये जागृती निर्माण केली. धार्मिक विधी सोपे सुटसुटित कसे करावे याची पुस्तिका समाजाने तयार केल्या. समाजाने शालेय विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबविले. समाजाच्या विविध ठिकाणी चळवळी निर्माण झाल्या. यात स्त्री शिक्षण, शेतकऱ्यांची चळवळ, बहुजन समाजातील शिक्षणाबाबतीतील चळवळी सुरु केल्या. राजर्षी शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाची शाखा आपल्या संस्थानात उघडून या कार्यास गती दिली.

## संदर्भ सूची

*कीर धनंजय, मालशे स.ग., फडके य. दि. (संपा), २००६, महात्मा फुले समग्र वांड्.मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती,*

*नांदेडकर. व.गो, २०११, राजकीय विचार आणि विचारवंत, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे*

*भोळे भास्कर लक्ष्मण, २०१६, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळखुरे बुक डिस्टीब्युटर्स, नागपूर*

*मुलाटे वासुदेव ( संपा), १९९९, महात्मा फुले लिखित सार्वजनिक सत्यधर्म, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद*

*राठी शुभांगी दिनेश , २०१४, महाराष्ट्रातील सामाजिक – राजकीय चळवळी व प्रशासन, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे*

*श्रृगारपुरे अरविंद, २००१, समग्र भारतीय व पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, विद्या प्रकाशन, नागपूर*